# Greenlawns School , Worli

## सहामाही परीक्षा (प्रथम-सत्र २०२४-२५)

इयत्ता - सहावी                                                  पूर्णांक - ८०

दिनांक -२३-९-२०२४          विषय- मराठी          वेळ - २ तास

सूचना:- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.

शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.

### विभाग - अ

### भाषा - विभाग (अंक - ४० )

प्रश्न १] खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा:- (१०)

i) लोकमान्य टिळक

ii) होळी

iii) टी.वी

प्रश्न २ ] खालील मुद्द्याच्या आधारे गोष्ट तयार करून शीर्षक द्या :- (७)

एक गाढव -----------भटकताना सिंहाचे कातडे सापडले -----------त्याने ते अंगावर चढवले ----------- इतर प्राणी घाबरले ----------- तेवढ्यात खरा सिंह आला ----------- मोठी गर्जना केली ----------- गाढव घाबरले -----------कातडे गळून पडले ----------- फजिती.

प्रश्न ३] खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :-

एक होता उंदीर. राजवाड्यात तो फिरत होता. राजाने त्याला पाहिले व नोकरांना बोलावून सांगितले, "याला धरा व मारा !" उंदराला आला राग. राजाची ऐट जिरवण्याचा त्याने निश्चय केला. एके दिवशी उंदीर बागेत फिरत होता. त्याला एक फडके सापडले. तो धावत शिंप्याकडे गेला व म्हणाला , " शिंपीदादा, शिंपीदादा हे फडके घ्या व एक झक्कास टोपी शिवून द्या बघू. राजा आहे दुष्ट , त्याला देतो मी कष्ट !" शिंपीदादा ने त्याला टोपी शिवून दिली. त्याला रंगीबेरंगी गोंडे लावले. उंदराने टोपी घातली. हातात डमरू घेतले व राजवाड्यात राजासमोर गाऊ लागला, " ढुम, ढुम तुडू , ढुम ! ढुम, ढुम तुडू, ढुम ! माझी टोपी किती छान, राजाची टोपी भिकार," राजाला आला राग , त्याने उंदराची टोपी काढून घेतली. त्याचबरोबर उंदीर गाऊ लागला, " ढुम, ढुम , तुडू , ढुम ! राजा भिकारी, माझी टोपी घेतली, राजा चिडला. त्याने उंदराची टोपी त्याच्याकडे फेकून दिली. उंदीर परत डमरू वाजवून गाऊ लागला, " राजा घाबरला, माझी टोपी दिली, ढुम, ढुम तुडू, ढुम ! ढुम , ढुम तुडू , ढुम ! डमरू वाजवत उंदीर निघून गेला.

प्रश्न :-

i) उंदराने कोणता निश्चय केला व का ? (२)

ii)उंदराने शिंपीदादाला काय सांगितले ? त्याच्यानंतर शिंपीदादाने काय केले ? (२)

iii)राजाने उंदराची टोपी का काढून घेतली ? (२)

P.T.O

iv)राजाने उंदराची टोपी का फेकून दिली?त्याने टोपी फेकल्यावर उंदीर राजाला कसा चिडवू लागला?(२)

v)वाक्य बनवा - टोपी , राजा (२)

## <u>व्याकरण-विभाग</u>

प्रश्न ४] खालील दिलेल्या निर्देशानुसार उत्तरे लिहा :-

i) समानार्थी शब्द लिहा- सागर , मुलगा (२)

ii) विरुद्धार्थी शब्द लिहा- दूर , शूर (२)

iii) लिंग बदला - भगिनी (१)

iv) वचन ओळखा - झाड (१)

v) वाक्य शुद्ध करा- मि काळच गावाहून आलो. (१)

vi) माझा शेड्युल्ड टेस्ट पेपर या दिवशी येतो - (१)

vii) रिकाम्या जागा भरा - आषाढ ---------------- भाद्रपद (१)

viii) खालील वाक्यातील रेखांकित नामाचा प्रकार ओळखून लिहा :- (२)

i)राजाचे दिवाणजी फार कर्तबगार आणि <u>नम्र</u> होते.

ii)<u>राधा</u>ने काही फुले विकत आणली.

ix) खालील वाक्यांत फक्त सर्वनाम ओळखून लिहा :- (२)

i) स्त्री आपल्या मुलांवर चांगले संस्कार करते.

ii) तिने थैली लाथ मारून ठोकरली.

## विभाग - ब

## साहित्य-विभाग (अंक -४०)

## गद्य-विभाग

प्रश्न ५] अ) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा :- (१२)

i) 'सुगरणीचे घरटे' या पाठातून काय शिकायला मिळाले ते लिहा.

ii) भीमरावांनी स्वतःबद्दलची कोणती माहिती गुरुजींना सांगितली ?

iii) आपण मातृभूमीबद्दल प्रेमभाव का बाळगायला हवा हे तुमच्या शब्दांत लिहा.

iv) जमिनीच्या पोटात कोणकोणती खनिजे सापडतात ? कारखान्यात धातूंपासून कोणकोणत्या वस्तू तयार होतात ?

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (४)

i) चुना कशापासून तयार करतात ?

ii) सुगरण पक्षी सुबक वीण कशाने घालतो ?

iii) वेफर्स कशापासून बनवतात ?

iv) विल्सन हायस्कूलच्या गुरुजींचे पूर्ण नाव लिहा.

इ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा:- (३)

i) जेवणाच्या ताटातला प्रत्येक ............. मोठ्या आईने दिला.

ii) ................... हे घरटे शाबूत राहते.

iii) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र भारताची ...................... लिहिली.

ई) कोण-कोणास म्हणाले ते लिहा:- (३)

i) "सुगरण पक्ष्याने किती छान घरटे बांधले आहे."

ii) "चांगली पुस्तके वाचली पाहिजेत."

iii) "बाळ तुझं नाव काय?"

उ) शब्दार्थ लिहा:- (३)

i)वाखाणणे -

a) स्तुति करणे , b) स्तुती करणे , c) स्तूती करणे d) स्तुत्ती करणे

ii)विस्तृत -

a) आफाट , b)अफ़ाट , c) आफ़्ट , d) अफाट

iii)प्रेमभाव बाळगणे -

a) प्रेम असणे , b)प्रेमं असणे , c) प्रेम आसने , d) प्रेम असने

## पद्य - विभाग

प्रश्न ६ ] अ) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा:- (६)

i) आलेल्या पावसामुळे बाबांनी चडफड का केली ?

ii) चंद्रावरच्या शाळेत पास केव्हा केले जाते ?

iii) तुम्ही डब्यात रोज कोणकोणते पदार्थ नेता ? त्याची नावे लिहा.

आ) कवितेच्या ओळी पूर्ण करा :- (४)

आईचेही -----------------------

पाऊस आला ! पाऊस आला !

--------------------------------

-----------------------------------

---------------------------- सुट्टी !'

इ) शब्दार्थ लिहा:- (३)

i) गिल्ला करणे-

a) गोंधळ करणे, b)गोधंळ करणे, c)गोंधळी करणे, d)गोंधळ कारणे P.T.O

ii) शतक -

a) शंबर , b)शाम्बर , c)संभार , d)शंभर

iii) चडफड -

a) रांग , b)राँग , c)राग , d)राघ

ई) कवितेतील शब्दांचे शेवटचे अक्षर सारखे येणारे शब्द लिहा. (२)

i)शाळा -

ii)अभ्यास -

समाप्त